पुढारी

# विद्यापीठात आज स्टार्ट अप यात्रा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागातर्फे शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी (दि. १४) महाराष्ट्र स्टार्ट अप यात्रा जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

नोंदणीकृत नवकल्पनांचे सादरीकरणासाठी दि. १४ रोजी तंत्रज्ञान विभाग येथे सकाळी १० वाजता एकदिवसीय जिल्हास्तरीय प्रशिक्षण सत्र होणार आहे. पहिल्या सत्रात विभागाच्या विविध योजनांची माहिती, स्टार्टअपच्या प्रवासातील टप्पे याबाबत मार्गदर्शन व स्थानिक उद्योजकांची व्याख्याने होतील. दुसऱ्या सत्रात दुपारी १२ वाजता सादरीकरणाची संधी देण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यामधून अव्वल तीन विजेते घोषित केले जातील. स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिक देण्यात येणार आहेत. प्रत्येक जिल्ह्यातील सर्वोत्तम सादरीकरणातून राज्यस्तरावर निवड करण्यात येणार आहे.

नावीन्यपूर्ण संकल्पना असणाऱ्या व्यक्तींनी www.msins.in किंवा www.mahastartupyatra.in या संकेतस्थळावर नवकल्पना नोंदवून शिबिरात सहभाग निश्चित करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल रेखावार व कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संजय माळी यांनी केले आहे.

सकाळ

# मानसिक आरोग्य दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात कार्यक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील मानसशास्त्र अधिविभागात जागतिक मानसिक आरोग्य दिन उत्साहात साजरा झाला. यानिमित्त अधिविभागातील विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रदर्शन केले. त्याचे उद्‌घाटन गांधी अभ्यास केंद्र व (कै.) श्रीमती शारदाबाई पवार अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी केले. डॉ. पाटील म्हणाल्या, ''समाजाचे मानसिक स्वास्थ्य चांगले राहण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करायला हवेत आणि मानसशास्त्र विभाग यामध्ये निश्चितच पुढाकार घेईल.'' अधिविभागात डॉ. प्रदीप पाटील (आकार फाउंडेशन, सांगली) यांचे 'बदलत्या काळातील स्त्रियांचे मानसिक आरोग्य' या विषयावर व्याख्यान झाले. ते म्हणाले, ''आदिम काळापासून स्त्री आणि पुरुष तीन वेगवेगळ्या स्तरांमध्ये विभागला गेला होता. स्त्रियांना जर मानसिक निरोगी व्हायचे असेल, तर विवेकी दृष्टिकोनातून विचार होणे गरजेचे आहे. स्त्रियांनी खंबीरपणे उभे राहण्यासाठी खंबीरतेचे कौशल्य अवगत करणे गरजेचे आहे.'' या कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थानी अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. सुभाष कोंबडे होते. डॉ. अश्विनी पाटील यांनी प्रास्ताविक आणि स्वागत केले. प्रा. मिलिंद सावंत उपस्थित होते. वैष्णवी माने हिने सूत्रसंचालन केले. ज्योती निकाळजे हिने आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2022
तरुण भारत

# विद्यापीठ निवडणूक सूचना आज होणार जाहीर

## उद्यापासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ : चार विद्याशाखा मतदारसंघाचे आरक्षण जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांसाठी १४ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. मतदारांची अंतिम यादी जाहीर झाली असून पुढचा टप्पा म्हणजे आज (दि. १४) रोजी रात्री उशिरा निवडणुकीची सूचना जाहीर होईल. तर शनिवार १५ ऑक्टोबरपासून ऑफलाईन उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ होईल. २८ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्यास परवानगी आहे. तसेच शिवाजी विद्यापीठ निवडणूक विभागाने गुरुवारी चार विद्याशाखा मतदारसंघाचे आरक्षण जाहीर केले.

शिवाजी विद्यापीठातील निवडणुकीची सूचना आज (दि. १४) रोजी जाहीर झाल्यानंतर उमेदवारी अर्ज भरण्यापासून खऱ्या अर्थाने निवडणुकीला रंगत येणार आहे. विद्यापीठ विकास आघाडीने प्रत्येक मतदार संघासाठी समित्या नेमल्या आहेत. त्यामुळे या समित्यांकडे संबंधित मतदार संघातील इच्छुक उमेदवार आणि मतदारांची



जबाबदारी दिली आहे. तसेच सुटानेही बैठका घेऊन शिक्षक मतदारसंघ आणि अभ्यास मंडळ मतदारसंघाची संपूर्ण तयारी केली. प्रत्येकाला कामाची विभागणी करून दिली आहे. तर शिवाजी विद्यापीठ आजी-माजी कृती समितीच्या मार्गदर्शन समविचारी संघटना पदवीधर मतदारसंघ लढवणार आहे. एकंदरीतच सर्वच संघटनांनी विद्यापीठ निवडणुकीची जय्यत तयारी केली आहे.

### विद्यापीठ विकास आघाडीच्या दोन्ही नेत्यांचा निर्णय मान्य

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीत सर्वच मतदारसंघ विद्यापीठ विकास आघाडी एकत्रित लढवणार आहे. विकास आघाडीचे नेते संजय डी. पाटील आणि उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ निवडणूक लढवणार आहे. दोन्ही नेते जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल.

**– अमित कुलकर्णी (माजी सदस्य, व्यवस्थापन परिषद, शिवाजी विद्यापीठ)**

### विद्याशाखांचे आरक्षण

| विद्याशाखा | आरक्षण खुला | आरक्षण राखीव |
|---|---|---|
| विज्ञान आणि तंत्रज्ञान | खुला प्रवर्ग १ | अनुसुचित जाती जमाती १ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | खुला प्रवर्ग महिला १ | भटक्या विमुक्त १ |
| मानवविद्या विद्याशाखा | खुला प्रवर्ग १ | अनुसुचित जाता १ |
| आंतरविद्याशाखीय विद्याशाखा | खुला प्रवर्ग १ | ओबीसी १ |

पुढारी

# विद्यापीठ निवडणूक; उद्यापासून अर्ज भरण्यास प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. शनिवार (दि. १५) पासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ होणार आहे. विद्यापीठ निवडणूक विभागाने गुरुवारी चार विद्याशाखांची आरक्षण सोडत जाहीर केली आहे.

विद्यापीठ निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. त्यानुसार अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाली आहे. निवडणुकीसाठी पदवीधर, शिक्षक, बीओएस, महाविद्यालय विभागप्रमुख, प्राचार्य, व्यवस्थापन परिषद सदस्य,



संस्थाचालक, विद्यापीठ शिक्षक असे मिळून ४० हजार ३१८ जण मतदानाचा हक्क बजाविणार आहेत. शुक्रवारी (दि. १४) निवडणूक सूचना प्रसिद्ध होईल. त्यानंतर २८ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आहे.

यापूर्वीच विद्यापीठ विकास आघाडी आणि विद्यापीठ विकास मंच यांनी एकत्रित निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले आहे. विकास आघाडीने प्रत्येक मतदार संघासाठी समित्या नियुक्त करून जबाबदाऱ्यांचे वाटप केले आहे. शिक्षक संघाने (सुटा) सर्व जागा लढविण्याचे जाहीर केले आहे. त्यानुसार शिक्षक मतदार संघ व अभ्यास मंडळासाठी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. डॉ. प्रवीण कोडोलीकर यांच्या नेतृत्वाखालील आजी-माजी विद्यार्थी कृती समितीने समविचारी संघटना व पदवीधर मतदार निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला आहे. निवडणुकीसाठी अर्ज भरण्यास सुरुवात झाल्यानंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ अधिसभा निवडणुकीसाठी आरक्षण जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीसाठी गुरुवारी (ता. १३) आरक्षण जाहीर करण्यात आले. यात चार विद्याशाखांमधील आरक्षण जाहीर करण्यात आले. अर्ज भरल्यानंतर निवडणुकीच्या प्रचाराला प्रत्यक्ष सुरुवात होईल. शुक्रवार (ता. १५)पासून ऑफलाईन अर्ज भरण्यास सुरुवात होणार आहे. २८ ऑक्टोबरपर्यंत अर्ज भरण्याची मुदत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीचा कार्यक्रम वेळापत्रकाप्रमाणे राबवला जात आहे. त्यानुसार पदवीधरांची मतदार नोंदणी, नोंदणी अर्जांची छाननी केली बुधवारी (ता.१२) मतदारांची अंतिम यादी प्रसिद्ध केली. आज राखीव जागांसाठी आरक्षण जाहीर केले. यामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखेमध्ये १ जागा खुल्या प्रवर्गासाठी असून, एक जागा अनुसूचित जाती, जमातीसाठी आहे. वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याखेला १ जागा खुल्या प्रवर्गातील महिला तर दुसरी जागा भटके विमुक्त यांच्यासाठी आहे. मानव्य विद्याशाखेतील एक जागा खुल्या प्रवर्गासाठी असून, एक जागा अनुसूचित जातीसाठी आहे. आंतरविद्याशाखीय विद्याशाखेमधील एक जागा खुल्या प्रवर्गासाठी असून, ओबीसींसाठी एक जागा राखीव आहे.

तरूण भारत

# उत्तरपत्रिका फोटो कॉपीसाठी ८५७ अर्ज

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झालेल्या उन्हाळी परीक्षा ऑफलाईन वस्तुनिष्ठ प्रध्दतीने घेण्यात आल्या. या परीक्षेमध्ये ओएमआरशीट व उत्तराचा गोल भरताना काही विद्यार्थ्यांनी संपूर्ण गोल भरला नसल्याने काही विद्यार्थ्यांचा निकाल अनुत्तीर्ण असा आला आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी फोटो कॉपीची मागणी केली आहे, त्यांना सोमवार १० ऑक्टोबरपासून फोटोकॉपी देण्यास प्रारंभ केला आहे. तीन दिवसात ८५७ विद्यार्थ्यांनी फोटोकॉपीसाठी ऑनलाईन अर्ज केले आहेत.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झालेल्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले. परंतू काही विद्यार्थ्यांचे निकाल अनुत्तीर्ण तर परीक्षेला उपस्थित असूनही झिरो गुण किंवा अनुपस्थित असल्याचा निकाल आला आहे. तर काहींना पेपर लिहूनही कमी गुण मिळाल्याचा निकाल प्राप्त झाला आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी फोटोकॉपीची मागणी केल्यामुळे गेल्या तीन दिवसापासून फोटोकॉपीसाठी



- **सोमवारपर्यंत ऑनलाईन अर्ज भरण्यास मुदत**
- **गेल्या तीन दिवसात ८५७ ऑनलाईन अर्ज**

ऑनलाईन अर्ज भरण्यास प्रारंभ झाला आहे.

यासंदर्भातील परिपत्रक महाविद्यालयाला पाठवले असून ज्यांना फोटोकॉपी पाहिजे त्यांनी १०० रूपये भरून अर्ज भरावा. तर २०० रूपये भरून पुन:तपासणीसाठी अर्ज भरावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

सकाळ

# स्पर्धा परीक्षा केंद्र प्रवेशासाठी मुलाखती

**कोल्हापूर, ता. १३ :** शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या २०२२-२३ या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. यातील प्रवेश परीक्षा झाली असून, त्याची गुणानुक्रमे असणारी यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या विद्यार्थ्यांचे गुणाच्या प्राधान्यानुसार मुलाखती घेतल्या जाणार आहेत. शुक्रवारी (ता. १४) आणि शनिवारी (ता. १५) त्यांच्या मुलाखती होणार आहेत. सदर मुलाखतीसाठी पात्र विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) मध्ये सर्क्युलर एक्झामिनेशन येथे पहायला मिळेल. मुलाखती स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, मानव्यशास्त्र इमारत या ठिकाणी घेण्यात येणार आहेत.

तरूण भारत

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या मुलाखती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे २८ सप्टेंबर रोजी घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेची गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे. गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांची १४ व १५ ऑक्टोबर रोजी मुलाखत घेऊन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी निवड करण्यात येणार आहे. शुक्रवार व शनिवार दोन दिवस सकाळी ११ वाजता मुलाखत विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारतीतील परीक्षा मार्गदर्शन केंद्रात होणार आहे.

पुढारी

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र प्रवेशासाठी आजपासून मुलाखती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातर्फे २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश परीक्षेतून गुणवत्तेच्या आधारे उपलब्ध जागेप्रमाणे विद्यार्थ्यांच्या दि. १४ व १५ रोजी सकाळी ११ वाजता मुलाखती घेण्यात येणार आहेत.

विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्यावतीने दि. २८ सप्टेंबर रोजी घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेची जनरल मेरीट यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवली आहे. मुलाखत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, मानव्यशास्त्र इमारत या ठिकाणी घेण्यात येणार आहेत, असे आवाहन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले आहे.

पुढारी



कोल्हापूर : शहर आणि परिसरात गुरुवारी सकाळी धुके पडले होते. शिवाजी विद्यापीठ परिसरात टिपलेले छायाचित्र. (छाया : पप्पू अत्तार)

पुढारी

# 'दूरशिक्षण' एमबीए फेरप्रवेश परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया झाली आहे. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन फेरप्रवेश परीक्षेचे आयोजन केले आहे. २० ऑक्टोबरपर्यंत प्रवेश परीक्षा अर्ज भरता येणार असल्याची माहिती उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी दिली.

पुण्यनगरी

# एमबीए फेरप्रवेश परीक्षेस मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेनुसार विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया झालेली आहे. तथापि, विद्यार्थी हितास्तव फेरप्रवेश परीक्षेचे आयोजन केले असून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी केले आहे. डॉ. बनसोडे म्हणाले की, एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे अभ्यासार्थींना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रोडक्शन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. प्रवेश इच्छुक विद्यार्थी, नोकरदार, गृहिणी, उद्योजक, व्यावसायिक, प्रोफेशनल इत्यादी हा अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात. ज्या विद्यार्थ्यांना एम.बी.ए.साठी प्रवेश निश्चित करायचा आहे, त्यांनी येत्या दि. २० ऑक्टोबरपर्यंत प्रवेश परीक्षा अर्ज भरावेत व दि. ३० ऑक्टोबरला प्रवेश परीक्षा द्यावी.